नि.फौ.ख.क्र.२४९/२०२१
शासन–वि–माया मानेकर
नि.क्र.१९

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – पांडुरंग प्रल्हादराव भगत,
वय अंदाजे ५५ वर्ष, कामधंदा– शेती,
राहणार– काजळसरा, तालुका देवळी, जि.वर्धा

..............................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ ची सरतपासणी – सहायक सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.**

१. दिनांक १६.०२.२०२० रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी सूचनापत्र दिले होते. आता मला सूचनापत्र दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.P1/PW4 देण्यात येते. त्याप्रमाणे मी माया मानेकर यांचे शेतात गेलो होतो. आरोपी माया मानेकर ही आमचे गावात राहते. माया मानेकर यांचेकडे असलेले शेत जवादे यांचे असून ती जवादे यांची मुलगी आहे. सदरचा घटनास्थळ पंचनामा इंधन पेटविल्याबाबतचा होता. मला आता सदर पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.P2/PW4 देण्यात येते. नकाशा घटनास्थळावर तयार करण्यात आला होता.

**उलट तपास आरोपीतर्फे – श्री.बी.डब्ल्यू.चौधरी विधीज्ञ यांचे मार्फत**

२. माझे मालकीचे शेत कोल्हापूर–शिंगापूर येथील शिवारात आहे. हे म्हणणे खरे आहे की वादातील जागा वाटखेडा शिवारातील आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर गेलो त्यावेळी महसूल विभागाचे अधिकारी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व हुस्नापुरे यांचे शेतजमिनीचे कागदपत्र पोलिसांकडे त्यावेळी नव्हते. फिर्यादीचे पती त्यावेळी हजर नव्हते. तसेच त्याची पत्नी फिर्यादी त्यावेळी हजर नव्हती. फिर्यादी ही स्वतः परिवारापासून विभक्त राहते. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळी गेलो नाही व पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी हुस्नापुरे व फिर्यादी

यांचे सांगण्यावरुन आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की वाटखेडा शिवारात आरोपी मायाबाई यांचे नावे कोणतीही शेतजमिन नाही.

उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीक्रुती | माझे समक्ष |
| MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.04.02 15:43:07 +0530 | MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.04.02 15:43:12 +0530 |
| (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) | (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६ | वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६ |